सौ. अनुरा हेमंत देव
302, आय विंग,
वृंदावन हाईट्स कोथरूड पुणे

# श्रावण मास

श्रावण मासी हर्ष मानसी
हिरवळ दाटे चोहिकडे
क्षणात येते सरसर शिरवे
क्षणात फिरुनी ऊन पडे
वरती बघता इंद्रधनूचा
गोफ दुहेरी विणलासे
मंगलतोरण काय बांधले
नभोमंडपी कुणी भासे - - - - - - - -

बालकवींची अजरामर असलेली, श्रावण महिन्याचे तंतोतंत, अप्रतिम सुंदर वर्णन करणारी ही कविता, सर्वांनी शालेय शिक्षण घेताना अभ्यासलेली आहे, तोंडपाठ केली आहे. अजूनही कविता पूर्ण पाठ असून अत्यंत आवडती आहे. सदर कविता वर नमूद ओळींपेक्षा मोठी आहे.

आषाढ महिना संपत आला की, श्रावण महिन्याचे वेध लागतात. मन जणू आनंदाने नाचू लागते. श्रावण महिना सुरु होईपर्यंत पाऊस सुरु होऊन बरेच दिवस झालेले असतात. त्यामुळे उन्हाळ्याने तप्त झालेली धरणीमाता जलपान करून तृप्त झालेली असते. नद्या नाले, तलाव, सर्व दुथडी भरून वहात असतात. तर डोंगर, कडे कपाऱ्यांवरून वाहणारे धबधबे त्यांच्या पांढऱ्याशुभ्र जलधारांनी निसर्ग सौंदर्यात भर घालत असतात. अतिशय प्रसन्न, उत्साही, आनंदी वातावरण असते. पानगळ झालेली सर्व झाडे पिवळे पडलेले गवत यांचे म्लान रूप जाऊन हिरवेगार टवटवीत ताजेतवाने झालेले असते. हा हिरवा रंग डोळ्याला सुखद गारवा देत असतो. या महिन्यात सोनचाफा, केवडा, पारिजातक अशा अनेक फुलांनी वनस्पतींनी सृष्टीचे वातावरण सुगंधीत केलेले असते. विविध रंगी फुलांनी झाडे बहरलेली असतात. माणूसच काय, सर्व पशु, पक्षी देखील आनंदी असतात असे भासते.

श्रावण महिन्याला धार्मिक दृष्टीनेही आपल्या संस्कृतीत खूपच महत्त्व आहे. श्रावण महिन्यातील

व्रतवैकल्ये तसेच नुकताच चातुर्मास सुरू झालेला असतो तीही व्रतवैकल्ये, विशेषकरून स्त्रिया करत असतात. श्रावणी सोमवारला विशेष महत्व आहे. बहुतेक लोक उपास करतात. संध्याकाळी शंकराच्या देवळात जाऊन पूजा करणे दर्शन घेणे याला फारच महत्त्व आहे. अनेक ऋषी मुनी आपल्या देशात होऊन गेल्यामुळे, धार्मिक, अध्यात्मिक परंपरा लाभली आहे. प्राचीन कथा, पुराणात प्रत्येक सणामागे असलेला इतिहास, त्याचे महत्व सांगितलेले आहे. परंपरेनुसारच भक्तिभावाने श्रावण महिन्यातील धार्मिक गोष्टी सणसमारंभ, व अन्य महिन्यातील सणसमारंभ साजरे केले जातात. श्रावण श्रावण महिन्यात मंगळागौर पुजली जाते. तसेच नागपंचमी, नारळीपौर्णिमा, रक्षापौर्णिमा हे सण विशेषत्वाने मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात.



श्रावण वद्य अष्टमी - श्रीकृष्ण जन्म साजरा केला जातो. गोकुळ अष्टमीचा उत्सव, मथुरा, वृंदावन, द्वारका या ठिकाणी तर साजरा केला जातोच पण प्रत्येक घराघरात अतिशय उत्साहाने, आनंदाने साजरा केला जातो. कृष्णाच्या देवळांमधे, घरीदेखील कृष्ण भजन, कीर्तन, पोथी वाचन, कृष्णकथा सांगणे असे निरनिराळे कार्यक्रम केले जातात. दुसऱ्यादिवशी, म्हणजे नवमीच्या दिवशी दहीहंडी बांधून ती संध्याकाळी सार्वजनिकरित्या बालगोपाळां-मार्फत फोडली जाते. कांही ठिकाणी दहीहंडीचा कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणावर असतो.

सामाजिक एकोपा, नातेसंबंधातील एकोपा कायम रहावा यासाठीच सर्वांनी एकत्र येऊन सण साजरे करण्याची प्रथा पडली असावी आणि त्यामुळेच त्यातील आनंद द्विगुणीत होतो यात शंकाच नाही.

असा हा विविधतेने नटलेला श्रावणमहिना फारच आनंद देऊन जातो हे खरे!

सौ अन्तरा हेमंत देव
मो. नं. ९४२३००८४०३